# यशोगाथा

## उपक्रमशिल शाळा व धडपडणारे शिक्षक













सन २०२२ - २३

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे

# उपक्रमशिल शाळा व धडपडणारे शिक्षक


| | | |
|---|---|---|
| **प्रवर्तक** | : | शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र शासन |
| **प्रकाशक** | : | जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे |
| **प्रेरणा** | : | **मा.रणजितसिंह देओल (भा.प्र.से.)**<br>प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, महाराष्ट्र राज्य |
| | : | **मा.सुरज मांढरे (भा.प्र.से.)**<br>आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे |
| | : | **मा. कैलास पगारे (भा.प्र.से.)**<br>राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई |
| | : | **मा.कौस्तुभ दिवेगावकर (भा.प्र.से.)**<br>संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण, महाराष्ट्र, पुणे |
| **संपादक तथा संपादन** | : | **डॉ. मंजुषा क्षीरसागर**<br>प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे |
| **संपादन सहाय्य** | : | **श्री.जयप्रकाश पाटील**<br>वरिष्ठ अधिव्याख्याता-जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे |
| | : | **डॉ. गिरीश बोरसे -** अधिव्याख्याता- जिल्हा शि. व प्र.सं.धुळे |
| | : | **श्रीम. सुचेता पाटील -** अधिव्याख्याता- जिल्हा शि. व प्र.सं.धुळे |
| | : | **श्री. चंद्रकांत पवार -** अधिव्याख्याता जिल्हा शि. व प्र.सं.धुळे |
| | : | **श्री. भालचंद्र पाटील -** अधिव्याख्याता जिल्हा शि व प्र. सं.धुळे |
| | : | **डॉ. शिवाजी ठाकूर -** अधिव्याख्याता-जिल्हा शि.व प्र.सं.धुळे |
| | : | **श्री. मिलिंद पंडीत -** अधिव्याख्याता-जिल्हा शि. व प्र.सं.धुळे |
| **शब्दांकन** | : | **श्रीमती. वैशाली पाटील :** विषय साधनव्यक्ती-गट साधनकेंद्र पं.स.धुळे |
| | : | **सौ.अर्चना वाडीले -** विषय साधनव्यक्ती- गट साधन केंद्र पं.सं.धुळे |
| | : | **श्रीमती. माधवी देसले -** विषय साधनव्यक्ती-गट साधन केंद्र,पं.सं.धुळे |
| | : | **श्रीमती. मनिषा पाटील -** विषय साधनव्यक्ती- गट साधन केंद्र,पं.सं.धुळे |
| | | **श्रीमती चेतना पाटील -** विषय साधनव्यक्ती - महानगरपालिका, धुळे |
| **प्रकाशन वर्ष** | : | २०२२-२३ |
| **अर्थसहाय्य** | : | Programe & Activity अंतर्गत शासनाकडून उपलब्ध निधीतून मोफत वितरणासाठी |
| **मुद्रक** | : | का.स.वाणी, धुळे |

## * अनुक्रमणिका *


| अ.नं. | शीर्षक | शाळेचे नांव | शिक्षकाचे नाव | पा.क्र. |
|---|---|---|---|---|
| १) | आमच्या ध्येयपूर्तीचा प्रवास | जि.प.शाळा बाभूळदे ता.शिरपूर | श्री.राकेश वामन पाटील | ०४ |
| २) | माझ्या शाळेतील उपक्रमांची यशोगाथा | जि.प.शाळा रांजणीपाडा ता.साक्री | श्री.विशाल शंकर चौरे | ०८ |
| ३) | करुया मुलांनो,गणिताशी गट्टी | म.न.पा.शाळा क्र.०३ ता.जि.धुळे | श्रीमती. रुपाली भारत मनिखेडकर | ११ |
| ४) | आणि मुले बोलकी झाली | जि.प.केंद्रशाळा शेवाळी ता.साक्री | श्रीमती. प्रतिभा शांताराम साळुंखे | १४ |
| ५) | Ready to Read | जि.प.कन्याशाळा, म्हसदी, ता.साक्री | श्रीमती.सुधर्मा झिपरु सोनवणे | १६ |
| ६) | गगन भरारी घेणारी माझी शाळा... | जि.प.शाळा धमाणे ता.धुळे | श्रीमती. बबिता बळीराम वाघ | १९ |
| ७) | आनंददायी उपक्रमांची शृंखला | जि.प.शाळा वाडी बु।। ता.शिरपूर | श्रीमती. मंगला तुमडू पाटील | २२ |
| ८) | माझ्या आव्हानांची यशोगाथा | जि.प.शाळा वारगाव ता शिंदखेडा | श्रीमती. संगिता भास्कर मराठे | २५ |
| ९) | गोष्ट स्थलांतरीत बालकांच्या शिक्षणाची ! | जि.प.शाळा अंचाडेतांडा ता.धुळे | श्रीमती. अरुणा नामदेव पवार | २७ |
| १०) | ''ध्यास गुणवत्तेचा'' | जि.प.सेमी इंग्रजी शाळा नं.१, वारुळ ता.शिंदखेडा | श्रीमती. अश्विनी दिलीप भामरे | २९ |

# प्रस्तावना

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे यांच्या वतीने जेव्हा गुणवत्तेच्या संदर्भात शाळा भेटी केल्या जातात. त्यावेळेस अनेक उपक्रमशिल शाळांमध्ये सर्व शिक्षकांचे आणि मुख्याध्यापकांचे प्रयत्न पाहून खूप आनंद होतो.बरेचदा काही शाळांमध्ये काही शिक्षकांचे वर्ग खूप छान असतात. त्या वर्गांमध्ये कृती, उपक्रमांची मालिका इतक्या सुंदर पद्धतीने घेतलेली असते. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद आणि कृती उत्तम पद्धतीने करुन अध्ययन निष्पत्ती साध्य झालेल्या दिसतात. अशा शाळांचे आणि धडपडणाऱ्या शिक्षकांचे प्रयत्न इतर शिक्षकांपर्यंत पोहचले पाहिजे त्यांनी आपल्या वर्गांमध्ये अभ्यासपूरक, अभ्यासेत्तर आणि उत्स्फुर्तपणे केलेले काही विशेष प्रयत्न इतर शिक्षकांपर्यंत पोहचण्यासाठी आपण एका पुस्तकरुपाने याच एकत्रीकरण करु शकतो, असा विचार संस्थेतील सर्व अधिकाऱ्यांच्या मनात आला. हे प्रथम पुस्तक आमचा देखील एक प्रयत्न आणि धडपड आहे. याशिवायही खूप सुंदर प्रयोग करणारे, अत्यंत चांगले काम करणारे शिक्षक़ धुळे जिल्ह्यात आहेत, याची जाणीव आम्हाला आहे. पुढील वर्षी आपल्या उत्तम शाळा आणि उत्तम वर्गांच्या यशोगाथा गोळा करण्यासाठी आम्ही आपल्या सर्व शिक्षकांची वाट पाहत आहोत.

पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा!

धन्यवाद...

**डॉ.मंजुषा क्षीरसागर**

प्राचार्य

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,धुळे



# आमच्या ध्येयपूर्तीचा प्रवास

**श्री.राकेश मगन पाटील**

शिरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाभूळदे साधारणत: १०० वर्षापेक्षाही जास्त इतिहास असणाऱ्या या शाळेची अवस्था सन २०१७ पर्यंत बिकटची झाली होती. शाळेची इमारत तशी सुस्थितीत होती मात्र डागडूजी अभावी शाळेने आपल्या रुपाने उदासिनतेत भर घातली होती. विद्यार्थी पटसंख्या ३०-३२ असूनही उपस्थितीचे प्रमाण खूप कमी होते. गावातील लोकांचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन देखील चांगला नव्हता. त्यामुळे लोकसहभाग व समाजसहभाग जवळ जवळ नाहीसा झाला होता. शाळा म्हणजे गावातील उनाड मुलांचा टाईमपास कट्टा झाला होता.

अशा परिस्थितीत नेतृत्वगुण व दूरदृष्टी असलेली व्यक्ती एखादया शाळेस लाभली तर योग्य पद्धतीने नियोजित विकास साधला जाऊ शकतो. सन २०१७ साली शाळेतील मुख्याध्यापक श्री.भरत पवार सर व आंतरजिल्हा बदलीने शाळेत हजर झालेले श्री.राकेश पाटील सर या जोडगोळीने परिस्थिती बदलविण्याचे मनाशी पक्के ठरविले.

मुख्याध्यापक व शिक्षक यांना विषयासंदर्भात आलेल्या अडचणी

(१)
पटनोंदणी व नियमित उपस्थिती

(४)
सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास

**शाळेविषयी अडचणी**

(२)
स्वच्छ व सुंदर शाळा

(३)
आनंददायी शिक्षण

**अ) पटनोंदणी व नियमित उपस्थिती :-**

शाळेच्या विकासातील सर्वात मोठी अडचण म्हणजे उपस्थितीचे प्रमाण अत्यल्प, जवळपास ३० ते ३५ पट असूनही दैनंदिन उपस्थितीचा आकडा नगण्य असायचा. मग शाळेच्या गुणवत्तेचा प्रश्न राहत नव्हता. शाळेत येणारे विद्यार्थी आपल्या सोयीच्या वेळेनुसार शाळेत येत असत व वाटेल तेव्हा घरी जात असत. शिवाय पालक पूर्णपणे अशिक्षित असल्याने त्यांना देखील शिक्षणाचे फारसे महत्व वाटत नव्हते म्हणून त्यांचे मतपरिवर्तन करुन पालक सहभाग वाढविणे खूप गरजेचे होते.

**ब) स्वच्छ व सुंदर शाळा :-**

शालेय इमारत पक्की, तीन वर्गखोल्या सुस्थितीत तरी देखील एकाच वर्गात सर्व विद्यार्थी बसत होते. शालेय परिसरात शालेय वेळात गावातील उनाड मुले टाईमपास करत बसत. शालेय परिसरात पान, गुटखा खाऊन, थुंकून घाण करत होते. एवढेच नाही, चक्क शाळेच्या व्हरांड्यात झोपून मोबाईलवर गप्पा मारीत. शाळेतील एका वर्गखोलीवर तर त्यांनी ताबाच मिळविला होता. एकंदरीत शाळेची इमारत, परिसर व इतर भौतिक व्यवस्था याबाबतीत कमालीची उदासिनता जाणवत होती अशा परिस्थितीत या सर्व मुलांचे मन न दुखवता त्यांचा उपयोग शाळेच्या विकासासाठी करुन घेणे, त्याचबरोबर समाजसहभाग, लोकसहभाग घेऊन शाळेचे अंतरंग बाह्यांग सजवणे, सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करणे या बाबी खूप आव्हानात्मक होत्या.

**क) आनंददायी शिक्षण :**

शाळेत डिजीटल साधनांसह शैक्षणिक साधने उपलब्ध असून देखील त्याचा वापर होत नसल्याने आनंददायी शिक्षण मिळत नव्हते त्याचा परिणाम विद्यार्थी उपस्थिती व गुणवत्तेवर होत होता. तेव्हा डिजिटल साधनांच्या वापरासाठी शिक्षकांना प्रशिक्षण घेणे गरजेचे होते. शैक्षणिक साधनांचा वापर करुन अध्यापन करण्याची सवय लावणे असे बदल शिक्षकांनी करणे आवश्यक

होते.

**ड) सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास :**

सहशालेय उपक्रम राबविण्यात विद्यार्थी उपस्थिती व गुणवत्ता या दोन गोष्टी अडचणीच्या ठरत होत्या. त्यामुळे सहशालेय उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थी विकास करण्यासाठी या दोन गोष्टींवर काम करणे गरजेचे होते.

वरील समस्यांचा अभ्यास करुन आम्ही दोघांनी मिळून समस्येवर तोडगा निघण्यासाठी उपक्रमांची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरु केली

**अ) पटनोंदणी व नियमित उपस्थिती :-**

शाळेत दाखलपात्र विद्यार्थ्यांची १००% पटनोंदणी व्हावी. तसेच गावातील सर्व मुले गावातील शाळेतच दाखल व्हावीत यासाठी दरवर्षी मार्च महिन्यात सर्वेक्षण करुन दाखलपात्र विद्यार्थ्यांच्या पालकांच्या भेटी घेऊन त्यांना समुपदेशन करण्यात येते. त्याचबरोबर शाळेची वैशिष्ट्ये दाखविणारी आकर्षक जाहिरात तसेच व्हिडीओ बनवून गावातील व्हॉट्स ॲप ग्रुप वर पाठविले जातात.

शाळेत दाखल असलेले विद्यार्थी १००% उपस्थित रहावे यासाठी शाळेत आज पर्यंत लोकसहभाग, पालक सहभाग यातून शाळेचे अंतरंग व बाह्यांग, वर्ग खोल्या, शालेय परिसर इत्यादी आकर्षक करुन सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. तसेच नियमित डिजीटल साधनाद्वारा अध्यापन, शैक्षणिक साहित्याचा वापर करुन आनंददायी पद्धतीने शिक्षण दिले जात आहे. दर शनिवारी नियमितपणे पालकभेट घेऊन विद्यार्थी प्रगती व उपस्थितीबाबत चर्चा करण्यात येते.

**ब) स्वच्छ व सुंदर शाळा :-**

एकेकाळी लोकसहभाग व पालक सहभागापासून वंचित असलेल्या शाळेने आज समाजाच्या माध्यमातून उदासीनतेची कात बाजूला सारुन स्वच्छ व सुंदर शाळा म्हणून नावारुपास आली आहे. अनेक भौतिक सुविधांची पूर्तताही लोकसहभाग व ग्रामपंचायतीच्या मदतीने करण्यात आली.

**आकर्षक अंतरंग, बाह्यंग वर्गखोल्या :**

ग्रामपंचायतीचा पाठपुरावा करुन संपूर्ण शाळेची इमारत आकर्षकपणे रंगविण्यात आली असून वर्गखोल्या, भिंती, व्हरांडा शैक्षणिक चित्रे काढून बोलके करण्यात आले आहेत.

**शाळेतील इतर भौतिक सुविधा :**




**क) आनंददायी शिक्षण :**

विद्यार्थ्यांना शाळेविषयी आवड निर्माण होऊन दैनंदिन उपस्थिती वाढावी तसेच मुलांचे शिकणे नैसर्गिक होऊन त्यांना शिकण्यात आनंद वाटावा यासाठी प्रत्यक्ष अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर, कृतीयुक्त सहभाग, याद्वारे आनंददायी पद्धतीने शिक्षण दिले जावे यासाठी पुढील उपक्रमांचे आयोजन केले जाते.

**१) शाळा शुभारंभ उपक्रम**

शाळापूर्व तयारी मेळावा- इ. १ लीत दाखलपात्र सर्व बालके व त्यांचे पालक यांना सहभागी करण्यासाठी गावस्तरावर प्रभातफेरी, दवंडी, पोस्टर्स लावून जनजागृती करण्यात येते. शाळेचे वातावरण प्रसन्न असावे याकरिता शालेय परिसराची स्वच्छता करण्यात येते. व बालकांना व त्यांच्या पालकांना मेळाव्यात सहभागी करण्यात येते.

**❊शाळा प्रवेशोत्सव व नवागतांचे स्वागत** :- दरवर्षी जून महिन्यात बैलगाडीवर गावातून मिरवणुक काढून सन्मानाने शाळेत आणले जाते त्यादिवशी गुलाबपुष्प देवून नवागतांचे स्वागत करण्यात येते व विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारामध्ये गोड पदार्थ दिला जातो. गावातील एकही मूल शाळाबाह्य राहणार नाही याची जबाबदारी घेतली जाते.

**❊डिजीटल वर्ग अध्यापन-** शाळेत नियमितपणे स्मार्ट टिव्हीचा वापर करुन विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यात येते.

इंग्लिश, मराठी, गणित इ. विषयांचे अध्ययन अध्यापन

मराठी कविता गायन, इंग्लिश कविता गायन, दररोजी दुपारी ३.०० ते ४.०० या वेळात शालेय अभ्यासक्रम डिजीटल वर्गात शिकविला जातो.

✻ **इंग्लिश विषयाचे उपक्रम -** इंग्रज़ी ही जागतिक भाषा, माहिती तंत्रज्ञानाची भाषा समजली जाते या विषयाची गोडी मुलांना लागावी म्हणून शाळेत विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात.




'वाचन उपक्रम-रुप लावण्य अभ्यासिता न ये
सहज गुणासी न चले उपाये
काहीतरी धरावी सोय ।
अगांतुक गुणांची ।।
अवगुण सोडिता जाती उत्तम गुण
अभ्यासिता येती ।'

असे समर्थांनी दासबोधात म्हटले आहे वाचन कौशल्याच्या बाबतीत तसेच म्हणता येईल. वाचनात येणारे अडथळे, दोष टाळून वाचन क्षमता प्राप्त होण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध प्रकारचे उपक्रम शाळेत सुरू आहेत.

✻ माझे परिपाठा पूर्वीचे वाचन
✻ सहभागी वाचन
✻ पुस्तक मेळावा
✻ परिपाठातील सामान्यज्ञान पाठांतर इ.१ली
✻ इ. १ ली सोपे शब्द वाचन
✻ कलेतून वर्णमाला
✻ गोष्ट वाचून सारांश सांगणे
✻ धुळपट्टीवर लेखन
✻ शैक्षणिक गुणवत्ता संवाद कार्यक्रम

**गणित विषयक उपक्रम :-**

✻ पाढे पाठांतर- दररोज परिपाठात सामुहिक पद्धतीने पाढेपाठांतराचा उपक्रम घेतला जातो.

✻ माझे गणित माझी कृती - विद्यार्थी आपल्या आवडीच्या घटकावरचे अध्यापन वर्गातील इतर मित्रांना समाजवुन सांगतात.

**ड) सहशालेय उपक्रमातून विद्यार्थी गुणवत्ता विकास :**

प्रत्येक बालकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे हा आपला ध्यास आहे. त्यासाठी सहशालेय उपक्रमांची योजना करावी लागते आणि म्हणूनच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शाळेत विविध सहशालेय उपक्रमांचे आयोजन केले जात आहे.

१) शनिवारची कवायत
२) शिक्षकदिन
३) संगीतमय परिपाठ
४) पोषणभार सप्ताह
५) वाचन प्रेरणा दिन
६) बालदिन
७) भाषण स्पर्धा
८) वृक्ष दिंडी व वृक्षारोपण
९) स्वच्छ भारत अभियान
१०) माता पालक गट मेळावा
११) शिकू आनंदे-विविध कलाकृती
१२) विविध जयंती पुण्यतिथी
१३) आनंददायी खेळ
१४) बेटी बचाओ बेटी पढाओ
१५) परिसर भेट व वनभोजन
१६) महिला मेळावा व हळदी कुंकू कार्यक्रम
१७) हर घर तिरंगा
१८)स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव रांगोळी स्पर्धा
१९) FLN माता पालक गृहभेटी
२०) विद्यार्थी व शिक्षक श्रमदान

आम्ही उपक्रमशीलता दाखविली आणि शाळेची भौतिक व शैक्षणिक स्थिती सुधारु लागली.

सन २०१७ ते सन २०२२ या पाच वर्षाच्या कालखंडात जी उद्दिष्टये समोर ठेऊन कामाला सुरुवात केली त्याचे अनेक सकारात्मक परिणाम आज दिसून येत आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे सुरुवातीला जी उपस्थिती खूप अत्यल्प होती आज तिच उपस्थिती रोज ९० ते ९५ % पर्यंत राहू लागली.

विद्यार्थी आनंदाने वेळेपूर्वीच शाळेत हजर राहू लागली. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत देखील कमालीची वाढ होऊन विद्यार्थी स्वत:हून सर्व प्रकारच्या उपक्रमात सहभागी होऊ लागले. शाळेचे अंतरंग व बाह्यांग आकर्षक झाल्याने शाळेचे वातावरण प्रसन्न वाटू लागले. याचाच परिणाम म्हणून गावातील लोकांचाही

शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आणि ते स्वत:हून शाळेच्या गरजांविषयी चौकशी करु लागले. लोकसहभाग वाढून शाळेच्या विकासास ते पोषक ठरले विविध सहशालेय उपक्रमांमुळे समाज, पालक, शिक्षक व शाळा एकमेकांशी जोडले गेले त्यामुळे सुरुवातीच्या काळात शालेय आवारात टाइमपास करणारी तरुण मंडळी आज कामाशिवाय आवारात प्रवेशही करत नाहीत. परंतु नेहमीच शाळेच्या मदतीसाठी तयार असतात शाळेने केलेल्या या सकारात्मक बदलाची योग्य दखल घेऊन महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ शिरपूर तालुका यांच्या मार्फत शाळेचा गुणवंत शाळा म्हणून पुरस्कार देऊन सत्कार करण्यात आला श्री.राकेश पाटील सरांना बीटस्तरीय पुरस्कार मिळाला एकेकाळी ज्या शाळेचे नाव काढले तरी लोक उपहासात्मक नजरेने पाहून खिल्ली उडवत होते. आज तीच शाळा दोन्ही शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, पालक, समाज व सर्वात महत्वाचे विद्यार्थी या सर्वांच्या सहकार्याने शैक्षणिक विकासाची वाटचाल करत आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेतील दोन्ही शिक्षक़ कटिबद्ध असून शाळेच्या मागील चार ते पाच वर्षातील बदललेल्या रुपाच्या आधारे यापुढील काळातही शाळेने भविष्यातील उद्दीष्ट्ये निश्चित केली असून त्याची पुर्तता करुन शाळेची प्रगती अशीच सुरू ठेवण्याचा शिक्षक़ांचा मानस आहे. शाळेच्या या यशस्वी वाटचालीत अनेकांचे योगदान व मार्गदर्शन लाभले. शाळेसाठी वेळोवेळी आर्थिक श्रमदान देणारे दाते पालक, माजी विद्यार्थी या सर्वांचे शाळे प्रती असलेले योगदान अमूल्य आहे.

''प्रयत्न वाळूचे कण
रगडिता तेलही गळे.''

याप्रमाणे आपण आपल्या कार्याच्या ठिकाणी पुर्ण मेहनतीने काम केले अर्थात आत्मा ओतला तर अशक्य असलेली गोष्ट शक्य होते. जगात अशक्य असे काहीच नाही प्रयत्नांती यश मिळविता येते. आज आमची शाळा उपक्रमशील शाळा म्हणून नावारुपास आली हे त्याचेच फलित म्हणावे लागेल.

**श्री.राकेश मगन पाटील**
उपशिक्षक
जिल्हा परिषद शाळा बाभुळदे
केंद्र, सावळदा, ता.शिरपूर





# माझ्या शाळेतील उपक्रमांची यशोगाथा

**श्री. विशाल शंकर चौरे**

जि.प.शाळा रांजणीपाडा ता. साक्री, जि.धुळे हे आदिवासी पेसा क्षेत्रातील लहानसे गांव गावाची लोकसंख्या फक्त २०० गावातील लोक श्रमिक व शेती व्यवसाय करणारे आहेत. गावाची आर्थिक परिस्थिती मध्यम स्वरुपाची आहे पण वैशिष्ट्यपूर्ण दोन बाबी म्हणजे लोकांना शिक्षणाची आवड आणि कुटुंबाने स्थलांतराला घातलेला आळा या होय. परिणामी मुलांची उपस्थिती १००% आणि गुणवत्ता ही उत्तम आहे. या गोष्टींचा फायदा घेऊन मनाशी निश्चय केला की, शाळेत बदल घडवावा. मुलांना फक्त गुणवत्तापूर्ण शिक्षण न देता विविध नाविण्यपूर्ण उपक्रम राबवून त्यांना व्यावसायिक व संस्कारक्षम बनवावे आणि माझी शाळा माझी जबाबदारी ह्या युक्तीप्रमाणे कामाला सुरुवात केली.शाळेत राबविलेले विविध उपक्रम.

**स्वच्छ विद्यालय -**

स्वच्छता असे जेथे, आरोग्य वसे तेथे,

स्वच्छता हा आपल्या जीवनाचा महत्वाचा भाग आहे. या संदेशाप्रमाणे शाळेचा परिसर, मुलांचे आरोग्य चांगले रहावे यासाठी शाळेने अनेक प्रयत्न केले मुलांना परिपाठात स्वच्छतेचे संदेश देण्यात आले. स्वच्छतेविषयी घोषवाक्य ‘स्वच्छ शाळा करा हातांनी, सुंदर गाणी गाऊ मुलांनी’,शाळा असावी सुंदर जेथे मुले मुली होती साक्षर मुलांकडून म्हणवून घेतो. आपला परिसर व शाळा स्वच्छ व सुंदर राहावी याविषयी मार्गदर्शन केले त्यात स्वच्छतागृहाचा वापर पाण्याचा वापर, सांडपाण्याचा योग्य वापर करण्याविषयी सांगण्यात आले.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचे गट करुन तयार केलेले असून प्रत्येक गटाला रोजची स्वच्छतेची जबाबदारी विभागून दिलेली आहे. शैक्षणिक वर्षात राज्यस्तरीय स्वच्छ विद्यालय पुरस्कार स्पर्धा घेण्यात आल्या. यात शाळेने आपला सहभाग नोंदवून शाळा स्वच्छ व सुंदर केली.

**शाळेचा दर्जा वाढविण्यासाठी जाहिरात -** जि.प.शाळा रांजणीपाडा आदिवासी क्षेत्रातील शाळा परंतु आपली मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकावी अशी पालकांची धारणा त्यामुळे मराठी शाळेत शिकण्याविषयीचा कल कमी होत असल्याने पालकांना उद्‌बोधन व जाहिरातीचा फंडा वापरुन शाळेकडे आकर्षित करण्यात आले. यश आले त्यामुळे शाळेच्या पटसंख्येत वाढ झाली. आज गावातील इ.१ली ते ४ थीचे १००% विद्यार्थी जि.प.शाळेत शिक्षण घेत आहेत.

**शालेय गणवेश -** इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील गणवेश हे विद्यार्थ्यांना आकर्षित करणारे असल्याने मुलांना ते हवेहवेसे वाटतात त्यामुळे आम्ही देखील विद्यार्थ्यांना इंग्रजी शाळांतील गणवेशाप्रमाणे गणवेश घेतले.

**कार्यानुभवातून फुलझाडे रोपवाटिका तयार करणे -** मुलांना नुसती श्रवणभक्ती करण्यापेक्षा हातांनी काम करायला आवडते त्यात ती रमुन जातात हा नेहमीचा अनुभव म्हणून आजच्या आधुनिक युगात मुलांना शालेय शिक्षणासोबत व्यावसायिक शिक्षणाचे महत्व पटवून देणे गरजेचे आहे. मी काहीतरी करु शकतो याची जाणीव मुलांना करून दिली पाहिजे. त्याचबरोबर सुजाण नागरिक म्हणून पर्यावरण रक्षणाची जबाबदारी प्रत्येकाने घेतली पाहिजे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून रोपवाटिका तयार करण्याचा उपक्रम शाळेत घेतला.

शाळेतील मुलांना श्रमाची कामे करण्याची आवड होती. त्यापैकी काहींना जड कामे देण्यात आली जशी माती आणणे, शेणखत गोळा करणे बाकी मुलांना माती भरणे खत,माती एकत्र करणे, पिशवीत माती भरणे, रोपे व बिया लावणे, पाणी भरणे अशी सोपी कामे देण्यात आली. प्रत्येकाला आवडीप्रमाणे काम मिळाल्याने प्रयोग यशस्वी झाला.

**परसबाग -** प्रधानमंत्री पोषण परसबाग निर्मिती स्पर्धा अंतर्गत जि.प.शाळा रांजणीपाडा शाळेने स्पर्धेत सहभाग घेतला परसबागे द्वारे विविध भाजीपाला व फळभाज्यांची लागवड केली. त्यात टोमॅटो, कांदा, लसूण, मिरची, कडीपत्ता, कोबी, फुलकोबी, वाल, कोथंबीर, बटाटे, अळू, शेपू, पालक, वांगे, मेथी, मुळा,

हळद, गिलकी, कारले इ. व अनेक प्रकारच्या औषधी वनस्पतींची लागवड केली. स्वत:चे गांडूळ खत निर्मिती प्रकल्प सुरु करण्यात आले. याच बरोबर परसबागेतील भाज्यांचे प्रकार, नाव, रंग, आकार व त्याचा आहारात होणारा उपयोग याविषयीची माहिती मुलांना सांगण्यात येते. एकंदरीत शालेय पोषण आहार अधिक पूरक करण्यासाठी परसबाग सार्थ ठरली. या उपक्रमांतर्गत पर्यवेक्षक अधिकारी यांनी शाळेला भेट देऊन साक्री तालुक्यातून द्वितीय क्रमांकांचे पारितोषिक देण्यात आले.

**गुणवत्तावाढीसाठी उपक्रम -** शिक्षणाची प्रक्रिया रंजक व आनंददायी झाली पाहिजे. प्रत्येक बालकाचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. आनंददायी शिक्षण, हसतखेळत शिक्षण अशा विविध संकल्पना दर्जेदार गुणवत्तेसाठी उदयास आल्या शैक्षणिक गुणवत्ता हा शाळेचा आरसा असतो. बालकाचा सामाजिक, मानसिक, भावनिक व बौद्धीक विकास व्हावा हे प्रत्येक शाळेचे ध्येय असते प्रत्येक बालक सर्वगुणसंपन्न बनविण्यासाठी त्याला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे या हेतुने शाळेने उपक्रमांचे आयोजन केले.

**इंग्रजी विषयाचे उपक्रम -** मुलांना इंग्रजी विषयाची आवड निर्माण होण्यासाठी इ.१ली पासूनच मनोरंजनात्मक पद्धतीने, गटपद्धती तसेच डिजीटल माध्यमाच्या सहाय्याने

* इ. १ली साठी Picture Reading
* Alphabets चा सराव
* सोपे इंग्रजी शब्द व वाक्य वाचन
* मनोरंजक खेळ

याप्रमाणे सराव घेतल्याने मुले शब्दांचे वाचन हसत-खेळत करु लागली. कृतीयुक्त अध्ययन-अध्यापन घडू लागले. मुलांची इंग्रजी शब्द संपत्ती वाढू लागली. माझे विद्यार्थी इंग्रजीचे साधे-साधे वाक्य वाचन करतात याचा आनंद झाला.

**गणित विषयाचे उपक्रम -** शाळेत येणाऱ्या प्रत्येक मुलाचे संख्याज्ञान व संख्येवरील क्रिया हे संबोध विकसित झाले पाहिजे. गणित हा विषय कंटाळवाणा न वाटता त्याविषयी गोडी निर्माण व्हावी यासाठी गणित पेटीतील शैक्षणिक साहित्य वापरुन मुलांचा कृतीयुक्त सहभाग घेऊन एकक, दशक, शतक, हजार, संख्यांचे वाचन, विस्तारीत रुप या संकल्पना समजावून दिल्या त्यामुळे मुले आज संख्यावाचन करतात.

**सुंदर माझे अक्षर -** शालेय अध्यापन व्यतिरिक्त ६० दिवसाचा सुंदर माझे अक्षर हा उपक्रम राबविण्यात आला. मुलांची लेखन व वाचनाची सवय उत्तम असल्याने अक्षर सुंदर कसे काढावे? या विषयी माहिती देण्यात आली. दुरेघी वहीत मुलांची अ ते अ: व क ते ज्ञ या अक्षरांच्या लेखनाचा सराव घेण्यात आला. तद्नंतर शब्द व सोपी, साधी वाक्य, जोडाक्षरे लिहिण्याचा सराव हा उपक्रम राबविल्याने मुलांचे हस्ताक्षर सुधारले.

**सहशालेय उपक्रम**




**ना नफा ना तोटा विक्री केंद्र -** शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला शाळा व्यवस्थापन समिती बैठकीत शैक्षणिक साहित्य खरेदी करणे. खरेदी केलेल्या साहित्याची इगतवारी करुन कुठलाही जास्तीचा दर न लावता तो शाळेतच विद्यार्थ्यांना विक्री करायचा असा निर्णय घेण्यात आला. यामुळे साहित्य घेण्यासाठी पालकांना आठवडे बाजारात जाण्याची गरज भासत नाही व विद्यार्थ्यांच्या अध्ययनात खंड पडत नाही.

**दिक्षा ॲपचा वापर -** ग्रामीण भागात पालकही Android Mobile चा वापर करु लागली आहेत. याचा उपयोग करुन शाळेतील शिक्षकांनी पालकांच्या मोबाईल मध्ये दिक्षा ॲप डाऊनलोड केले व दिक्षा ॲपचा वापर करण्यासंदर्भात मार्गदर्शन केले. यामुळे मुले घरी देखील स्वयंअध्ययन करु लागले. मुले पुस्तकातील QR कोड स्कॅन करुन स्वयंअध्ययन करतात.

**क्षेत्रभेट -** वर्षा ऋतुतील धाडसी सहल बालकांचा सर्वांगीण विकास साध्य करावयाचा झाल्यास अभ्यासपूरक उपक्रम निवडून विद्यार्थी सहभागातून त्याची यशस्वीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. क्षेत्रभेटीतून विद्यार्थ्यांचे अनुभवविश्व वाटून चौफेर ज्ञान मिळणार आहे. त्यांची निरीक्षण, शोधक व जिज्ञासू वृत्ती वाढीस लागणार आहे या दृष्टीने वर्षा सहलीचे आयोजन करण्यात आले. अतिकठीण डोंगरावर चढाई करुन निसर्गाच्या कुशीत वसलेलया 'धाण्या-बाण्या' गड देवाच्या भेटीला मुलांना

घेऊन गेलो. या सहलीतला अनुभव ही सहल म्हणजे भविष्यातील 'रांजणीपाडा'गिर्यारोहकांचा पायाच म्हणावा लागेल.

डोंगरावर उंच ठिकाणी धुळे व नंदुरबार 'पोलीस बिनतारी संदेश प्रशिक्षण केंद्र' याची माहिती श्री संतोष जाधव सरांनी विद्यार्थ्यांना दिली. शाळेत मुलांनी तयार केलेले 'Seed Boll' प्रत्यक्ष परिसरात रोपण करण्यात आले व वृक्षारोपण देखील करण्यात आले. सहली दरम्यान लागणाऱ्या उपयोगी वस्तूंची माहिती मिळाली उदा. तंबू, वृक्षारोपणासाठी लागणारी अवजारे, चढाईसाठी लागणारी सामग्री, वन्य प्राणी, पाण्याचा योग्य वापर अशा अनेक गोष्टींचा अनुभव मिळाला.

**वृक्षसंवर्धन १००० (Seed Boll) तयार करणे -** मुलांना वृक्षसंवर्धनाचे महत्व, वृक्षांची गरज वृक्षारोपण यांचे संस्कार रुजविणे व विद्यार्थी वृक्षमित्र होतील अशा संस्कारक्षम उपक्रम शाळेत राबविण्यात आला. फावल्या वेळात मुलांकडून काहीतरी करुन घ्यायचे व वेळेचा सदुपयोग कसा होईल यासाठी शाळेने सीड बॉल तयार करण्याचे ठरविले. चिखलाचे गोळे तयार करणे, बियांचा संग्रह करणे, माती, शेणखत व बिया यांचे मिश्रण करुन १००० गोळे तयार केले व परिसरात मोकळ्या जागेत त्यांचे रोपण केले. प्रत्यक्षात रोपण केलेले सीड बॉल अंकुरात रुपांतर होण्यास सुरुवात झाली यामुळे कामाचे चीज झाले असे वाटू लागले. आपल्या पृथ्वीचे रक्षण करण्यासाठी हा आमचा एक छोटासा प्रयत्न.

**शाळा व्यवस्थापन समिती सक्रिय सहभाग -** रांजणीपाडा शाळेला सोलर बसविलेले आहे परंतु सोलर किटची क्षमता कमी असल्याने डिजीटल अध्यापन करण्यास खूप अडचणी निर्माण होऊ लागल्या. शाळेला वीज पूर्ण वेळ मिळत नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे ही समस्या शाळा व्यवस्थापन समिती सदस्यांना समजली त्याच काळात गावात नवीन घर बांधणीचे काम सुरु होणार होते. समितीतील सदस्यांची कसलीही पर्वा न करता घरबांधणी पाया खोदण्याचे काम स्वत: हाती घेतले आणि त्या मजुरीतून मिळालेले १७०० रु.शाळेला मदत म्हणून दिले. शाळेला दोन दिवसातच नवीन मीटर MSEB छडवेल (कोर्डे) यांच्याकडून बसविण्यात आले. आता विद्यार्थ्यांना डिजीटल माध्यमाने अध्यापन करण्यात येत आहे. यासाठीच तर .

शाळेला गावाचा, आधार असावा,
गावाला शाळेचा अभिमान असावा

याप्रमाणे शाळा व्यवस्थापन समिती सदस्य शाळेला वेळोवेळी मदत करण्यास तत्पर असतात. 'गाव करी ते राव काय करी' हे समितीने सिद्ध करुन दाखविले. आज जि.प.शाळा रांजणीपाडा ही साक्री तालुक्यातील उपक्रमशील शाळा म्हणून ओळखली जाते. उपक्रम राबवित असताना बऱ्याच अडचणी आल्या, त्रास ही होताच पण तो जाणवत नव्हता कारण स्वत:हून स्वीकारलेले काम कधीच कठीण वाटत नाही प्रयत्न केल्यास यश हमखास मिळते याचा प्रत्यक्ष अनुभव आला.

***श्री. विशाल शंकर चौरे***
*सहा.शिक्षक*
*जि.प.शाळा रांजणीपाडा केंद्र-नवापूर*
*ता.साक्री, जि.धुळे*
*मोबा: ९०२११२४२१९/८२७५३४९८६१*





# करुया मुलांनो, गणिताशी गट्टी !

श्रीमती. रुपाली भारत मनिखेडकर

माझ्या शाळेतील मुलेही रामदेवबाबा नगर, हमीद नगर, जुने धुळे, वरखेडी अशा झोपडपट्टी परिसरातील आहेत. साधारणपणे ३०% ते ४०% मुले ही एकल पालकत्व असलेली आहेत. काही मुलांना आई तर काहींना बाबा (वडील) नाहीत. मुलांचे पालक उदरभरणासाठी दिवसभर कामाला जातात. पालक अशिक्षित असल्याने अभ्यासाला पूरक वातावरणाचा प्रश्नच उरत नाही. कोरोना काळात मुलांचे शैक्षणिक जीवन उध्वस्त झाले. संपूर्ण जगात Online शिक्षण सुरु होते. परंतु माझ्या मुलांकडे Online शिक्षणासाठी कोणतेही साहित्य उपलब्ध नव्हते. त्यामुळे मुले शिक्षण प्रवाहातून दूर गेली. काही मुले अभ्यास विसरली. मुलांना अभ्यासाची गोडी निर्माण व्हावी, आनंदाने गणित शिकता यावे म्हणून गणिताचे उपक्रम हाती घ्यावेसे वाटले मग मला माझ्या मदतीला सेतू चाचणी आली.

शैक्षणिक वर्ष जून- २०२२ मध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे (महाराष्ट्र) यांनी सेतू चाचणीचे आयोजन केले होते. त्यामुळे अध्ययन स्तर निश्चिती झाली. कोरोना काळात पहिली. दुसरीला असलेली मुले यावर्षी अनुक्रमे तिसरी, चौथीत आली ही मुले भाषा व गणित विषयांत खूपच मागे पडली होती. मुलांना ११ पासून पुढचे अंक ओळखता येत नव्हते. दोन अंकी संख्येची बेरीज जमत नव्हती. आमच्या शाळेच्या दृष्टीने ही बाब गंभीर होती. इ. ३ री व इ.४ थी चा वर्ग माझ्याकडे होता. दोन्ही वर्गांचा मिळून एकूण पट २५ होता. या सर्व मुलांच्या गणितातील अडचणी दूर करणे मला गरजेचे वाटत होते. त्यासाठी मी गणिताच्या उपक्रमाची मालीका तयार केली.

विद्यार्थ्यांना मुलभूत ज्ञानासह वरील सर्व घटकांचे संपूर्ण ज्ञान अवगत रहावे हा माझा उद्देश होता. माझ्या उपक्रमांची सुरुवात १ ते ९ अंक व शुन्याच्या संबोधापासून झाली.




✻ **उपक्रमाची अंमलबजावणी-** उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी गणिताचे घटक व उपघटक ठरविले व अध्ययन निष्पत्ती प्राप्तीसाठी मी घटकांचे नियोजन करुन खालील उपक्रम हाती घेतले.

उपक्रम अंमलबजावणी
↓
घटक व उपघटक ठरविणे
↓
अध्ययन निष्पत्तीप्राप्तीसाठी
घटकांचे नियोजन

✻ १ ते ९ अंक व शुन्याचा संबोध - १ ते ९ अंक व शुन्याचा संबोध स्पष्ट करण्यासाठी मुलांकडून परिसरातील उपलब्ध साहित्य पाने, फुले, खडे, काड्या, गोट्या इ. व शाळेतील गणित पेटीतील साहित्य-घन ठोकळे, गणितीय जाळीच्या सहाय्याने १ ते ९ अंकाची ओळख, श्रवण, अंकांचे वाचन, अंकाचे लेखन करुन घेतले तसेच काहीच नाही म्हणजे शून्य हा संबोध विद्यार्थ्यांना समजवून सांगितला.

✻ सराव - चित्रे व संख्यांच्या जोड्या लावणे, वस्तू मोजून संख्या लिहिणे, अंकाइतक्या उडया मारणे, टाळ्या वाजविणे, बोटे दाखवणे अशा कृती करुन विद्यार्थ्यांकडून सराव करुन घेतला.

**✻ दशक ओळख, १० ची ओळख -** विद्यार्थ्यांचा १ ते ९ अंकांचा सराव झाल्यानंतर नऊमध्ये एक मिळविला तर १० होतो. दहा म्हणजे दशक, दहा वस्तूंचा गट म्हणजे दशक स्पष्ट केला. एकक, दशक, दहा वस्तूंचा गट म्हणजे दशक स्पष्ट केला. एकक, दशक संकल्पना विद्यार्थ्यांना समजून सांगितली.

**✻ ११ ते १०० अंक ओळख -** नोटांचा वापर करुन ११ ते २०, २१ ते ३० ९१ ते १०० या संख्या विविध उदाहरणांद्वारे स्पष्ट केल्या. दोन अंकी संख्या शिकवितांना एकक, दशक ही संकल्पना दृढ केली. सोबतच लहान-मोठी, चढता-उतरता क्रम, आधीची संख्या पुढची संख्या याप्रकारे लेखन करुन घेतले. दशक, एकक संकल्पनेसाठी वस्तूंचा वापर करुन दशक व एकक, स्वरुपात रचना करुन संख्या -सांगणे तसेच स्वतंत्रपणे संख्या लिहिण्याचा अनुभव दिला.

**✻ शतकाची ओळख व लेखन -** ३ अंकी संख्येचे वाचन व लेखन शिकवितांना नाणी-नोटांचा वापर केला. शतक, दशक, एकक अशी खाती आखून खात्यांमध्ये वस्तूंची मांडणी करुन मुलांना संख्या लेखन शिकविले. रोज संख्यांचे वाचन व लेखन घेतले. १०१ ते २००....९०१ ते १००० इथपर्यंत रोज १०० संख्या लिहिण्याचा सराव घेतला.

✻संकल्पना- नाणी-नोटांचा वापर करुन स्थानिक किंमत, विस्तारीत रुप, दर्शनी किंमत यांचे प्रात्यक्षिक घेवून संकल्पना स्पष्ट केल्या.

✻ संख्यावरील क्रिया - दैनंदिन उदाहरणांच्या मदतीने बेरीज करण्याची संधी विद्यार्थ्यांना दिली. तीन अंकी संख्येत दोन अंकी संख्या मिळवून बेरीज करण्याचा सराव घेतला. मुलांनी आधी नोटांच्या सहाय्याने बेरीज केली. नंतर ठोकळे मांडून बेरीज केली. मग यांचे लेखन व मांडणी करुन बेरजेचे वाचन शिकविले.

✻ वजाबाकी करतांना कमी करणे, काढणे हे आधी विद्यार्थ्यांना समजावले. बेरजेसाठी लागणारे साहित्य घेऊनच वजाबाकीची मांडणी, लेखन करून गणित सोडवून घेतली.

**✻ पाढे पाठांतर व गुणाकार-** रोज परिपाठाच्या वेळी पाढे पाठ करुन घेतले. तिसरी-चौथीची काही मुले २० पर्यंत तोंडी पाढे म्हणू लागली. गुणाकार म्हणजे एकाच संख्येची पुन्हा-पुन्हा केलेली बेरीज हा संबोध समजवला. चौकटीचा वापर करुन एक अंकी संख्येला एक अंकी संख्येने गुणणे, दोन अंकी संख्येला एक अंकी संख्येने गुणणे, तीन अंकी संख्येला एक अंकी संख्येने गुणणे अशा प्रकारे गुणाकार शिकविला.

**✻ भूमिती/भौमितिक आकार -** शाळेत व परिसरात उपलब्ध असलेल्या भौमितिक आकारांसाठी साहित्याचा वापर करुन ते आकार शिकविले. रांगोळी, धान्य, पाने, मणी, खडू यांचा वापर करुन बिंदू, रेष, रेषाखंड, किरण, कोन, त्रिकोण, आयत, चौरस, वर्तुळ शिकविले. मुलांकडून साहित्य वापरुन भौमितिक आकार तयार करुन घेतले. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषेत व्याख्या तयार केल्या.

**✻ अपूर्णांक-**अपूर्णांक शिकविण्यासाठी सर्वप्रथम एक पोळी वापरुन विद्यार्थ्यांकडून अर्धा पाव, पाव अर्धा, पाऊन या संकल्पना स्पष्ट केल्या. विद्यार्थी अपूर्णांक चित्ररुपात रंगवू लागली. वाचन करु लागली. लहान व मोठा अपूर्णांक कसा ओळखायचा हे देखील प्रात्यक्षिक व चित्राच्या आधारे स्पष्ट केला. तसेच सरावासाठी उदाहरणे दिली.

**✻ कालमापन** - विद्यार्थ्यांना तास व मिनीटे ही वेळ मापनाची एकक आहेत हे समजावून सांगितले. प्रत्यक्ष घड्याळ व शैक्षणिक साहित्याचा वापर करुन घड्याळाची प्रतिकृतीद्वारे विद्यार्थ्यांना कालमापन ही संकल्पना स्पष्ट केली.

**✻ दिनदर्शिका -** दिनदर्शिका वर्गात लावून दिली. आजचा वार व तारीख दिनदर्शिकेवर दाखवा हा उपक्रम सर्व विद्यार्थ्यांसाठी राबवला. महिन्याचे नाव, दिवस, एकूण सोमवार, मंगळवार... शनिवार किती वाराप्रमाणे तारखा विचारणे अशा प्रकारे मुलांची दिनदर्शिका ही संकल्पना स्पष्ट करुन दिली.

**✻ आकृतीबंध -** गणित पेटीतील फोम रोप्सचा वापर करुन आकृतीबंध या घटकाकडे मनोरंजकपणे मुलांना वळवले. फुले, पाने, डबा, बॉटल, खूड, चित्रे यांचा जास्तीत जास्त वापर केला. मुलांना स्वत:चा आकृतीबंध तयार करण्यास सांगितला. विद्यार्थी आनंदाने सहभागी झाले. आकृतीबंध ही संकल्पना स्पष्ट झाली.

**✻ संख्यांचा आकृतीबंध -** आकृतीबंध ही संकल्पना चांगली समजलेली असल्यामुळे संख्यांचा आकृतीबंध विद्यार्थ्यांना समजावणे सोपे गेले. एकक ठोकळे यांचा वापर करुन संख्यांचा आकृतीबंध शिकवला. दशकदांडे व एकक ठोकळे यांचा वापर करुन संख्यांच्या टप्प्यांचा आकृतीबंध शिकवला. आता मुले

फळ्यावर दिलेला आकृतीबंध पूर्ण करु लागली.

नाणी-नोटा-दैनंदिन जीवनातील हिशोब मुलांना येत होता नाणी-नोटांचे ज्ञान होते. सुट्टे-बंदे, एकूण रुपये असे प्रश्न देऊन नाणी-नोटा-शाळेत उपलब्ध साहित्य देवून संकल्पना स्पष्ट केल्या. नाणी -नोटांचा दैनंदिन वापर करुन व्यवहार असा करावा याचा अनुभव देण्यासाठी शाळेत बाजारहाट हा उपक्रम राबवला. मुलांना प्रत्यक्ष खरेदी विक्रीचा अनुभव दिला.

✻ **मापन-वजन** विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनातील वस्तू उदा. साखर, कांदा, शेंगदाणे, भाज्या यांचे मापन असे केल जाते. यावर प्रश्न विचारुन वजनाचे एकक समजवून सांगितले. वजनासाठी लागणाऱ्या विविध काट्यांचे चित्रे व अर्धा, पाव, किलोग्रॅम दाखवून तर काही काट्यांचा वापर करुन प्रत्यक्ष वस्तूंचे वजन करण्याचा अनुभव दिला. विद्यार्थ्यांनी आनंदाने सहभाग नोंदवला व तो अनुभव त्यांना नाणी -नोटा शिकवितांना बाजारहाट उपक्रमात खरेदी-विक्रीच्या वेळेस आला व त्यांचे वजनाच्या एककाविषयीचे ज्ञान दृढ झाले.

✻ **लांबी,रुंदी,उंची** : विद्यार्थ्यांना सुरूवातीला सेंटीमीटर, किलो मीटर, कि.मी. यांची ओळख करुन दिली. दोरा, वित, पट्टीच्या मदतीने ढोबळ लांबी मोजण्याचा सराव घेतला. पट्टीच्या मदतीने टेबलाची लांबी, रुंदी, उंची मोजण्याचा प्रत्यक्ष अनुभव देवून प्रश्नोत्तरे घेतली. विद्यार्थ्यांना एकमेकांची उंची मोजण्याचा अनुभव देवून दृढीकरण केले.

✻ **आकारमान व धारकता-** पाण्याने भांडयातील व्यापलेल्या जागेस त्या पाण्याचे आकारमान म्हणतात, हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृती करुन समजावून सांगितले. पाव लिटर, अर्धा लिटर, एक



लिटर, दिड लिटर, २ लिटर धारकतेची भांडी घेवून त्या मापाच्या मदतीने भांड्यावर खुणा करून मापे तयार करुन घेतली व विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मोजण्याची संधी दिली.

वरील मापनाच्या सर्व कृतीवरून विद्यार्थ्यांना वजन, धारकता व अंतर यांचे मापन कोणत्या एककात करतात हे समजावले.

✻ **उपक्रमाची यशश्विता -** मुले आता शाळेत दिलेला गृहपाठ घरुन करुन आणतात. सरावासाठी मागील शिकवलेल्या भागावर उदाहरणे देणे, रोज संख्यावाचन घेणे, घड्याळात दाखविलेली वेळ विचारणे, दिनदर्शिकेवर प्रश्न, संकीर्ण उदाहरणे सोडवायला देणे आज मुले सहज क्षमताधिष्ठीत उदाहरणे सोडवू लागली. वर्षाखेरीस मुले गणितातील मूलभूत संबोध समजू लागली. मुले लॅटिस गुणाकार, हातच्याची वजाबाकी, नि:शेष भाग जाणाऱ्या संख्यांचा भागाकार सहज सोडवू लागली. त्याचबरोबर मुले आता वर्गकामात एकमेकांना मदत करतात. कृती उपक्रमात हिरीरीने सहभाग घेतात. मुलांमध्ये वेगळा आत्मविश्वास निर्माण झाला. मुलांच्या उपस्थितीतेच्या प्रमाणात वाढ झाली. मुलांच्या मनातील गणिताविषयीची भिती दूर झाली. यातून माझ्या शाळेत घेतलेल्या उपक्रमांची यशस्वीता मला मिळाली.

***श्रीमती. रुपाली भारत मनिखेडकर***

*उपशिक्षिका*

*मनपा शाळा क्र.३, जि.धुळे*

*मो.नं.: ९५१८३७०३७५*





# आणि मुले बोलकी झाली...

प्रतिभा शांताराम साळुंके

धुळे जिल्ह्यातील साक्री पासून ५ किलोमीटर अंतरावर भद्रावती नदीच्या काठावर बसलेले एक गांव शेवाळी - गावाच्या मध्यभागी असलेली दुमजली कौलारु शाळा म्हणजे शेवाळीची जिल्हा परिषद केंद्रशाळा होय. लोकवर्गणीतून तसेच ग्रामपंचायत निधीतून शाळेचा भौतिक विकास, डिजिटल वर्ग तयार झाले आहेत. पालकांकडून विद्यार्थ्यांना लेखन साहीत उपलब्ध झाले आहे. ग्रामसुधार मंडळाच्या देखरेखीत आजही शेवाळीची ही मराठी शाळा मोठ्या डौलाने उभी आहे. माझेही प्राथमिक शिक्षण (१ ते ४) याच शाळेत झाले त्यावेळी या शाळेस ''जीवन शिक्षण'' केंद्र शाळा असे संबोधले जायचे. आज मला या गोष्टीचा मनस्वी आनंद आहे की, मी ज्या शाळेत शिक्षण घेतले. तेथेच मला आज ज्ञानदानाची सेवा करण्याचे भाग्य लाभले आहे.''

**विविध पारंपारिक उपक्रम.**




कोरोना कालानंतर विद्यार्थ्यांनी अभ्यासातील गोडी पूर्ण संपलेली होती. मग त्यांना अभ्यासात गोडी निर्माण होणेसाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणेस प्रारंभ केला, यात प्रथम टाकाऊ साहित्यापासून टिकाऊ साहित्य निर्मिती करणे बाबतचा उपक्रम हाती घेतला टाकाऊ साहित्यापासून टिकाऊ साहित्य निर्मिती करणेसाठी पुढीलप्रमाणे उपक्रम घेण्यात आले होते.

असे अनेक खेळ आणि उपक्रम त्यांच्यासाठी कंटाळवाणे झाले होते. पुन्हा तेच उपक्रम घेवून त्यांना गोडी लावणे शक्य नव्हते त्यासाठी नवीन काहीतरी करणेचा विचार मनात आला.

''शिक्षण म्हणजे लक्ष लावून श्रवण भाषणाची मैफिल मोठी सूर स्वत:ला असो वा नसो, फक्त वाहवा यावी ओठी'' या उक्तीप्रमाणे नवीन वर्ष, नवा हर्ष व नविन स्वप्ने घेवून शैक्षणिक गुणवत्ता विकास गुणवत्ता विकासासाठी प्रवास सुरु केला. मुलांना चांगल्या सवयी लावणे, दूरदृष्टी-नवीन विचार करण्याची सवय लावणे, गरज व आव्हनांना तोंड देण्याची वृत्ती विकसित करणे, त्याच प्रमाणे कृतिशील अध्यापनातून उपलब्ध असलेल्या साहित्यापासून नवनिर्मिती करणे सुरु केले.

लॉकडाऊननंतर जेव्हा माझी मुले वर्गात बसू लागली. तेव्हा वर्गात ते वहीची कोरी पाने फाडून विमान बनवून उडविणे, भिरभिरे बनविणे, पंखा बनविणे, कोऱ्या कागदांचा चेंडू बनवून, एकमेकांच्या अंगावर फेकणे यांसारख्या कृती करत होते. रोजच्या कचऱ्याच्या टोपलीत करुन वहीच्या कोऱ्या पानांचा कचराच असायचा. अशा वेळी मुलांना रागावून तर चालणार नव्हते. त्यांना शाळेची गोडी लावणे, त्यांच्यातील न्यूनगंड दूर करणे, सांघिक भावना वाढीस लावणे, सहकार्य करण्याची वृत्ती, निर्माण करणे अत्यंत गरजेचे होते. विद्यार्थ्यांना मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग व्यवहारात करता आला म्हणजेच खऱ्या अर्थाने त्याचे शिक्षण झाले असा शिक्षणाचा अर्थ होतो. विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष सहभागातूनच हे घडणे शक्य होते. आता माझ्या सर्व विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष मनमोकळेपणाने गप्पा करणे, नकला, खेळ, गाणी, गोष्टी, हास्याविनोद करणे, घरातील-कुटुंबातील सुखदु:खाच्या गप्पा

करणे, घरातील परिस्थिती जाणून त्यांच्याशी आपुलकीने वागणे यासारख्या विविध कृती मी त्यांच्याबरोबर करु लागले. यांतून अपेक्षित प्रतिसाद मुलांकडून मिळत गेला. हळूहळू, त्यांचा जिव्हाळ्याचे नाते निर्माण होऊन, त्यांच्या मनातला न्युनगंड दूर होण्यास सुरूवात झाली. आपण आपल्या मुलांसाठी काही तरी करु शकतो, असा आत्मविश्वास बळावला.

आमच्या गावात पूर्वीपासूनच नाट्य,भजन, विविध सांस्कृतिक कार्यक्रमाची आवड सर्वांना होती एक भन्नाट-नाविन्यपूर्ण कल्पना मला सूचली. वर्गातील मुलांना त्यांनीच फाडून फेकलेले सर्व कागदाचे चिरोटे बादलीत घाणा घेवून त्यात टाकले, काही विद्यार्थ्यांना रोज ते कुचकरुन एकजीव करण्याची जबाबदारी सोपविली. तीन दिवसांनी एकजीव केल्यावर त्याचे द्रावण तयार झाले. आठ दिवसानंतर ते मिश्रण गाळून कापडाने घट्ट पिळून त्यात अर्धे गव्हाचे पीठ, अर्धे मेथी पूड आणि फेविकॉल मिसळले. भांड्याचा आकार बनविणेसाठी काही निवडक भांडे जमविले. ओला कापड, भांड्यांवर टाकून त्यावर बनविलेला लगदा टाकून आकार देणे सुरू केले. तीन दिवसानंतर कापडापासून भांडे वेगळे केले. आठवडाभर सुकविल्यानंतर त्यावर रंगकाम केले. अशाप्रकारे कागदाच्या लगदयापासून मुखवटे, बाहुल्या तयार केल्या. या कामात मला माझ्या शाळेतील सहकारी शिक्षक व माझ्या विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

विविध नाटिका तयार करणे ही आमच्या गावची परंपराच आहे. मी देखील एकपात्री नाटकात सहभागी व्हायचे. विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी मी याचा चांगलाच वापर केला. विद्यार्थ्यांना मी स्वत: बाहुली नाट्याचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. विद्यार्थ्यांनीही आनंदाने बाहुल्यांचा संवाद समजून घेतला व स्वत:ही करु लागले. आज माझ्या वर्गातील मुले हात धुवा मोहिम, स्वच्छता, निरक्षरता, आरोग्य, व्यसनमुक्ती यांसारख्या विविध विषयांवर बाहुली नाट्य सादर करतात. आदर्श परिपाठात बाहुली नाट्याद्वारे मनोगत व्यक्त करतात.

माझ्या वर्गात आता कागदाचे पंखे, चेंडू,विमान उडविणे, यासर्व गोष्टी, बंद झाल्या. वह्या फाडणे, कचरा करणे थांबले. विद्यार्थ्यांमध्ये नविन दृष्टी निर्माण झाली. कागद कशापासून बनतो? कसा बनतो? कागदाचे महत्व किती? यासारख्या विविध प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांना या नाविन्यपूर्ण उपक्रमातून मिळाली. वहीची पाने फाडणे चुकीचे होते, हे त्यांना उमगले, आता माझा वर्ग स्वच्छ असतो. मुलेही आनंदाने शाळेत येऊ लागले. अशा प्रकारे अनेक अडचणींवर मात करत मी माझ्या मुलांना शिक्षणाचा गोडी लावली तसेच गोडी वाढविली. माझी मुले आता आनंदाने गाऊ लागली.

''कौलारु असली तरी असू दे,

आई मला मराठी शाळेत जाऊ दे.''

वरील उक्तीप्रमाणे माझ्या मुलांना शाळेची गोडी लागली माझ्या उपक्रमाचा उद्देश सफल झाला आणि माझी मुले बोलकी झाली.

***प्रतिभा शांताराम साळुंके***
*उपशिक्षिका*
*जि.प.केंद्रशाळा, शेवाळी (दा.)*
*ता.साक्री,जि.धुळे*







# Ready To Read

श्रीमती सुधर्मा झिपरु सोनवणे

धुळे जिल्ह्यातील साक्री आणि धुळे तालुक्यातील सीमेवर नैसर्गिक-आध्यात्मिक, शैक्षणिक, सामाजिक, कृषिप्रधान असा श्रीमंत वारसा घेऊन डोंगर, दऱ्या, झरे यांच्या कुक्षीत अमरावती नदीच्या काठी वसलेले तीर्थक्षेत्र म्हणजे म्हसदी गाव.

जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था धुळे येथून प्रतिनियुक्तीने काम करुन Large amount of knowledge and experience घेऊन १० फेब्रुवारी २०२१ रोजी जि.प.शाळा म्हसदी येथे रुजू झाले. आपणांस माहीत आहे, सदर कालावधी हा महामारीचा होता. आयुष्यच अनिश्चित झाले होते तेथे शिक्षण कसले? शिक्षण म्हणजे आभाळ पेलणे, आठ हात लाकूड आणि नऊ हात ढलपी म्हणजे अगदी अशक्य गोष्ट. ऑनलाईन अभ्यासाचा तेवढा आधार.

ऑनलाईन, ऑफलाईन अभ्यास करत, करत तिसरीचे वर्ष संपले. सुखरूप आणि निश्चित जीवनशैलीसोबत निश्चित. नियमित नविन शैक्षणिक वर्ष सुरु झाले. मुलींनी ४ थीचा वर्ग गाठला. वर्गात ३६ मुली. पैकी २ ते ३ मुलींना इंग्रजी मुळाक्षरे फक्त परिचित होती. मग इंग्रजीतून संवाद, संभाषण, वाचन, लेखन तर दूरच. पण मुलींनी मराठी वाचन सोबत इंग्रजी वाचन उत्तम करावे, अशी माझ्या हृदयाची हाक. मग मी माझे Large amount of knowledge and experience चे पुस्तक उघडले आणि मुलींना मराठी भाषेसोबत इंग्रजी भाषेतही स्वत:चे नाव, शाळेचे नांव, शिक्षकांचे नाव, शब्द डोंगर, लहान गोष्टी, हेडलाईन्स, होर्डिंग्ज, क्रमिक पुस्तकातील पाठ वाचता आले पाहिजे हे ध्येय निश्चित केले.

यासाठी मी काही अध्ययन निष्पती निवडल्या.

**Learning outcomes :-**

1. Listen to English words, greetings, polite forms of experession, simple sentences and responds in English or mother tongue.
2. Participates and enacts in role play, short skits, play-lets in English.
3. Reads English seen in the surrounding with understanding and art resonable speed.
4. Reads English seen in the surrounding with understanding and art resonable speed on the classroom wall, on noticeboard, in posters and in advertisements.
5. Reads text written by different people.

अध्ययन निष्पत्ती निश्चित झाल्या. इंग्रजी भाषा अध्ययनाचा मुलींसोबतचा माझा प्रवास सुरु झाला. आणि बघता बघता, आश्चर्य !

**Strategics and experiements -** Therefore as a teacher I followed some strategies and tricks did some experiments for my starts (students) to improve reading skill as well as listening speaking and writing.

1) I prepared a PPT initially to incorporate phonics which focused on letter sounds over letter names. I made my learners enjoy songs of letters, stories of letter sounds, Words families, digraphs, trigraph, quadrgraph in PPT. I started my journey with lowercase letters.

**Link :** 1) https://linksharings.samsungscloud.com/x6WP1eUMLk0G [PPT FOR READING)

2) I made them listen Audols of prey, poems, stories, Garden or words, lessons, pledge and constitution in my own voice. I used tehnology as per need and demands of time to introduce and practice more over of pronunciation, syllables, stress, pause and intonation for fluent reading and speaking.

**Link :** 1) https://linksharing.samsungcloud.com/dSXR6vYHyLSa (Pledge)

2)https://linksharing.samsungcloud.com/fthZBQtvFiNv (Constitution)

3) https://linksharing.samsungcloud.com/actFkilVBPKE/ (Garden of words)

4) https://linksharing.samsungcloud.com/iC0OCxm3YbQK (The hare and the tortoise)

**3) Song of part of speech -** I composed this lines to

introduce grammar functionally, to build up confidence and to speak out fluently with proper intonation and pause.

Every name is called a noun-

Mountain, Fountain, Village and Town

In the place of noun pronoun stands-

He, she, they clap their hands.

An adjective tells about things-

Beautiful wings and golden rings.

A verb tells action- done, Read, write, jump and run.

How action done, an adverb tells - Quickly, slowly, easily well.

Well Preposition shows relation, At the school. To the station. Conjuction joins in many ways, Word to word and phase to phase.

Interjection cries.Out Oo! no! also! als ! How nice is this glass !

Link : https://youtu.be/crUHIuHEuhE (Song of part of speech)

4) Song of Punctuation mark - Walk, walk, walk, Run, run, run, stop, stop I'm full Stop. bat, ball, box put into sak. Come comma come Back to back.

Who, where, why, what, how dark ? Here I'm Question mark. Oo! oo! wow! How beautiful tree!

says exclamotry.

5) Word Table Reading and Writing - I prepared word tables to practice on reading writing without explaning trammatial elements. But 95% girls learnt sentence structure easily and effortlessly.

6) Played lots of Word Games. I used to play many educational games with girls Given below.

**GAMES -**

1) Integrated speaking- In this game I used to ask at least 5 questions to girls about school and home environment and they were speaking or communicating or answering in Marathi, Hindi trying in English or some times mother tongue. It helped girls to build up confidence.

2) Come Come Come : let's Communicate.

https://linksharing.samsungcloud.com/biTy RdmbQ3Q!

3) loud reading -

https://linksharing.samsungcloud.com/oXTVz7d3eZW!

4) Write what you read- in this game I used to give a paragraph to read then asked girls to turn the page an write words them short sentences they have read.

5) Word Table Reading and Writing- I prepared word tables to practice on reading writing without explaining grammatical elements. But 95% girls learnt sentence structure easily and effortiessly.

6) Played lots of word Games. I used to play many educational games with girls Given below.

**GAMES :**

1) Integrated speaking :- In this game I used to ask at least 5 questions to girls about school and home environment and they were speaking or comunicating or answering in Marathi, Hindi trying in English or some times mother tongue. It helped girls to buildup confidence.

2) Come Come Come. let's Communicate.

https://linksharing.samsungcloud.com/biTvRdmb Q3Q!

3) loud reading -

https://linsharing.samsungcloud.com/oXTVz7 dBeZW!

4) Write what you read- in this game I used to give a paragraph to read then asked girls to turn the page and write words then short sentences they have read.

5) Picture Reading :- in this game girls used to read and describe picture. It helped to improve vocabulary eventually.

Yes, most important I used to speak to learners in English constantly and continously as per situation. So that it helped them to improve their listening and ultimately speaking and reading skill, In this way i conducted some pre reading, while reading and post reading activities to improve reading skill.

**Earned outstanding achievement :**

Applying these above strategies my stars got Ready To Read English coherently and co-ordinately in reasonable speed.

1) https://youtu.be/6L0P0el-31c (girls are reading)

2) https://youtu.be/OCCSTY oskU (girls are reading)

3) https://linksharing.samsungcloud.com/qH7Of KAid GOH (Speech Tejal)

4)https://linksharing.samsungcloud.com/pcM7i3WZO6su (role play by girls) Out of 36 girls,

**15 means 41.65 girls** read highlights in NEWS paper, hordings, short stories, Can read short invariant books. lessons in my English book four.

**10 means 27.68 girls** conduct morning assembly collectively, communicate in group and pair, deliver thoughts by giving speech occasionally in proper paush and intonation.

**25 means 69.44 girls** read fluently familier words for unfamilier text, word towers.

**32 means 88.89 grils** read fluently and wrote their own as well as their friend's name, school's name, village's name, teacher's name in English in beautiful handwritting and proper formation.

**30 means 83.33 girls** listen and respond attentively.

I am flying high to shear, my 8 stars participated in English marathon competition conducted by NEWS paper Divya Marathi. My school is the only school of Z.P. Schools who participated and achieved spectacular success.

**Out 8 starts,** 4 stars secured **first rank. 3** stars secured **second rank** and 1 star secured in merit list.




अशा प्रकारे मुलींसोबतचा हा प्रवास अजून संपलेला नाही. प्रत्येकाने एक एक मैलाचा दगड सर केलेला आहे. प्रत्येकाला आहे त्या जागेवरून पुढे नेण्याचा प्रयत्न चालूच आहे. Listening speaking and reading करणाऱ्या मुलींना सोबत घेऊन पुढे writing पर्यंत हा प्रवास सुरु राहणार आहे.

देवयानी, तेजल, अनन्या, काव्या, परी, रिदधी, यशश्री, दिपाली, डिम्पल, राधिका या उत्तम इंग्रजी वाचतात. इंग्रजीतून उत्तम संवाद करतात. उत्तम भूमिकाभिनय करतात.

I am very happy my stars are now ready to read not the words but the world

**"Todays Reader tomorrows Leader"**

***श्रीमती सुधर्मा झिपरु सोनवणे***

*जि.प.शाळा म्हसदी,*

*ता.साक्री,जि.धुळे*





## उपक्रमांचे पंख लावून गगन भरारी घेणारी शाळा !

**श्रीमती बबिता बळीराम वाघ**

''विद्यार्थ्यांना उपक्रमांचे पंख लावून गगन भरारी घेणारी माझी शाळा आहे.''

''जग अमुचे किती सुंदर सुंदर
जग अश्रुचे नंदनवन सुंदर
आलो इथे आम्ही पंख पसरुनी
गाऊ गाणी हि दुनिया न्यारी
दुनिया न्यारी....

**पार्श्वभूमी :** पूर्वी विद्यार्थ्यांना मातीचा गोळा म्हटलं जायचं आणि शिक्षकांना कुंभार! मात्र या विधानाला वळण दिले ते UNICEF ने ते म्हणजे ''**मुल एक इवलेसे रोपटे आणि शिक्षक हा माळी**''

मी देखिल माळ्याप्रमाणे माझ्या लेकरांना अनेक उपक्रमातून वाढवले आहे ते पुढीलप्रमाणे -

**माझ्या उपक्रमांची मालिका :-**

**१. तालबद्ध संगीत कवायत**

**उद्दिष्टे :** १) आनंददायी कृती करणे.
२) शारीरिक विकास घडवून मनोरंजन होणे.
३) मनोरंजनातून शिक्षणाकडे वाटचाल वाढविणे.

**कार्यवाही :** * झिंगाट गाण्यावर ४ मिनिटांपर्यंत कवायतीचे हात घेणे.

* ''मेरा मुल्क मेरा देश'' या गाण्यावर कवायत घेणे.

* संगीत (Music) कवायतीचे लगातार १ ते ५ हात घेतले.

निष्पती : १) विद्यार्थी अध्ययन करण्यास आनंदाने प्रवृत्त होतात.

२) विद्यार्थ्यांची उंची, वजन वाढण्यास मदत होऊन त्यांचा शारीरिक विकास होतो.

३) विद्यार्थ्यांचा उत्साह वाढून न चुकता उपस्थित राहतात.

४) संगितामुळे संवेदनशिलता, भावभावना व सर्जनशील वृत्तींची निर्मिती होते.

**२) Happieness In Presenty**

उद्दिष्ट : १) इंग्रजी विषयाचा आत्मविश्वास वाढविणे
२) इंग्रजीत मनमोकळेपणाने बोलता येणे
३) शब्द संपत्तीत वाढ होणे
४) दैनंदिन जीवनात इंग्रजीत बोलण्याचा प्रयत्न करणे.

**कार्यवाही :** Monday - Boday Poets
Tuesday - Wild Animals

याप्रमाणे दररोज इंग्ऱ्जी विषयाचा घटक़ देऊन मुले इंग्रजीत हजेरी देतात.

जसे- Monday ला Body parts हा घटक दिल्यावर विद्यार्थी आपली किंवा समोरच्या विद्यार्थ्यांचे Body parts ची नांवे सांगतात.

Tuesday- Wild animal विद्यार्थी जंगलात राहणाऱ्या प्राण्यांची नावे ऐकून, चित्रात बघून किंवा T.V. वर बघून सांगतात.

याप्रमाणे आठवड्याची हजेरी आनंदाने घेण्याचा प्रयत्न केला.

निष्पत्ती : १) इंग्रजीचा शब्दकोश वाढला.

२) मुले बोलकी होऊन वेळेवर उपस्थित राहून हजेरी देऊ लागले.

३) हजेरी देतांना कुतूहलाचे वातावरण तयार होते.

४) वर्गातला प्रत्येक विद्यार्थी इंग्रजीत बोलण्याचा प्रयत्न करु लागला.

**३. तयारी स्पर्धा परीक्षेची**

१.मंथन २. Spelling Knowledge Test

उद्दिष्ट : १) स्पर्धेच्या युगात टिकून राहणे
२) सतत अभ्यासाची आवड निर्माण होते.
३) मेहनत व चिकाटी या गुणांची जोपासना होते.

कार्यवाही **''मंथन''** ही परीक्षा अहमदनगर येथील मंथन पब्लिकेशनद्वारा घेतली जात असुन इयत्ता १ ली ते ८ वी पर्यंतच्या सर्व माध्यमांच्या (मराठी,इंग्रजी,सेमी इंग्रज़ी) विद्यार्थ्यांसाठी असते. यात भाषा, इंग्रजी, गणित, बुद्धिमत्ता चाचणी यावर परीक्षा घेतली जाते.

Spelling Knowledge Test ही परीक्षा Prakash Acadmy, Dhule यांच्यामार्फत घेतली जाते. ही परीक्षा English विषयावर १०० गुणांची होते.

या स्पर्धा परीक्षेसाठी मी विद्यार्थ्यांकडून Idea word, Make a Spelling, Word Chain तसेच सराव पेपर घेऊन त्यांची तयारी करुन घेतली.

यात Spelling Knowledge Test गजानन संजय पाटील हा विद्यार्थी ९४ गुण मिळवून विभागात प्रथम आला.

निष्पत्ती : १) विद्यार्थी १ ली पासूनच स्पर्धा परीक्षेची पूर्वतयारी करतात.

२) स्पर्धा परीक्षेंचा पाया तयार होतो.

३) वेळेनुसार पेपर सोडवण्याचा सराव होतो.

४) गुणवत्ता यादीत आल्याने आत्मविश्वास वाढून स्पर्धा परीक्षा देण्यास अधिक उत्साही होतात.

५) विद्यार्थी गुणवत्ता वाढण्यास मदत होते.

**४. कृतीयुक्त पाढे**

**उद्दिष्टे** : १) विद्यार्थ्यांची सर्जनशीलता वाढणे.
२) गणिती क्रिया जलद गतीने करणे.
३) आनंदाने पाढे पाठ करणे.

**कार्यवाही** : * परीपाठ झाल्यावर विद्यार्थी दररोज कृतीयुक्त पाढे म्हणतात.
* २ ते ३० पर्यंतच्या प्रत्येक पाढ्यावर कृती बसवून ते लयबद्ध म्हणतात.

**निष्पत्ती**: १) विद्यार्थी आनंदाने लयबद्ध पाढे म्हणू लागले.

२) विद्यार्थी स्वतः ३० नंतरचे पाढे तयार करुन त्यावर कृती बसवतात.

३) पाढे पाठ झाल्याने गुणाकार व भागाकार या क्रिया सहजतेने करतात.

५. मनोरंजनातून नैतिक मूल्यांची जोपासना होते.

**उद्दिष्टे** : १) विद्यार्थ्यांत सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होणे.

२) या उपक्रमांतून सहकार्याची भावना विकसित होणे.

**कार्यवाही** : शालेय पोषण आहार सप्ताह, शैक्षणिक सहलींचे आयोजन या उपक्रमात

१) कडधान्य भाज्या व फळे यापासून रांगोळ्या काढल्या.

२) पुरक आहाराचे कृतीयुक्त गीतातून महत्व सांगितले.

३) आहाराचे महत्त्व सांगणारी नाटिका नागरीकांसमोर व पालकांसमोर सादरीकरण केले.

४) शैक्षणिक सहलीचे आयोजन करुन परिसरातील विविध गोष्टींचा अनुभव घेतला.

**निष्पत्ती** : १) विद्यार्थ्यांत नैतिक मूल्यांची जोपासना होते.
२) कार्यक्रमास अनुसरून वेशभूषा करतात.
३) सादरीकरणामुळे आत्मविश्वास वाढला.

माझ्याकडे इयत्ता १ लीत २५ विद्यार्थी दाखल होते पण या विविध उपक्रमांतून विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढून आज माझ्या इयत्ता ४ थी त ३६ विद्यार्थी आनंदाने शिक्षण घेतात.

**समारोप** : ''दिल है छोटासा, छोटीसी आशा...'' याप्रमाणे तालबद्ध कवायतीतून मुलांना आनंदित केले Happiness in Presenty यातून आनंददायी वातावरणातून हजेरी, देऊन विद्यार्थ्यांनी अभ्यासाला सुरूवात केली. तयारी स्पर्धा परीक्षांची नव्या जगाशी झगडण्यासाठी मुलांनी परीक्षेच्या माध्यमातून वाटचाल सुरू केली. Prakash Acadmy ने जागतिक भाषा इंग्रजीचे द्वार खुले केले. स्वच्छंद बागडण्यासाठी कृतीयुक्त पाढयातून मुलांनी/विद्यार्थ्यांनी मनोसक्त आनंद मिळवला.

''चारित्र्याचा विकास घडविते तेच खरे शिक्षण''
- स्वामी विवेकानंद

अशा प्रकारे दिवस भरातील वर्गातील बाग माझी प्राण्यांशी शब्दांशी, कृतीशी, संगिताने बहरली...

***श्रीमती बबिता बळीराम वाघ***
*जि.प.शाळा धमाणे,*
*ता.जि.धुळे*









# आनंददायी उपक्रमांची श्रृंखला!

**श्रीमती. मंगला तुमडू पाटील**

जून महिन्यात पहिलीचा वर्ग सुरू झाला आणि नवीन आलेली लहान-लहान चिमुरडी बालके-थोडीशी धास्तावलेली, बुजरी, त्यांचे हसणे बागडणे, प्रसंगी रडणे, मध्येच मला मॅडम ऐवजी 'आई म्हणणे' साडीचा पदर धरणे, धावणारी, धडपडणारी, बावरणारी, दबक्या पावलांनी येणारी माझी मुले पाहिल्यावर मन प्रफुल्लित व्हायचे.

मी ठरवले होते की, माझ्या वर्गातील प्रत्येक मुल शिकले पाहिजे, नियमित उपस्थित राहून टिकले पाहिजे, आणि दर्जेदार अध्ययन करीत प्रगत झाले पाहिजे. त्यानुसार शाळेच्या पहिल्याच दिवशी या चिमुकल्यांना प्रत्यक्ष त्यांच्या घरी जाऊन चॉकलेट-बिस्कीट देत, गप्पा मारत शाळेत घेवून आले. कारण या छोट्याशा बालकांना शाळेच्या वेळेत बसायची सवय नसते. त्यासाठी मी केलेला हा छोटासा प्रयत्न होता.

दारासमोर रांगोळी, हसऱ्याबाई, स्वच्छ शाळा, भरपूर झाडी, बगीचा पाहिल्याने मुलांची अर्धी भिती कमी झाली. पहिल्या दिवशी सुद्धा  मुले कशी टिकून राहतील? त्यांना शाळेबद्दल ओढ, आपुलकी कशी वाटेल ? याकडे माझा कटाक्ष होता. मी स्वतः लहान बनून त्यांच्यामध्ये रममाण होऊन, छोटी बडबडगीते, गोष्टी सांगून खेळामध्ये रमविते. बरेचदा शिकवित असतांना मुले ही मध्येच उठून बाहरे जातात. तर काही मुलांना झोप येते. अशा मुलांसाठी माझ्याजवळ विशेष कृती असतात.

नवीन कल्पना, उपक्रम, शैक्षणिक साहित्य, वर्ग सजावट, शालेय आवार स्वच्छ सुशोभित , शालेय दप्तर व्यवस्थित याची जोड मी नेहमीच गणितातील बरेच 'अमृत संबोध' आकलन होण्यासाठी परिसरातील साहित्यासह शासनाने पुरविलेल्या (भास्कराचार्य पेटी व अध्ययन समृद्ध साहित्य संच पेटी)

असे एक ना अनेक उपक्रम मी वर्गात घेण्याचा प्रयत्न करते. अध्ययना निष्पतीसाठी 'मूर्तीकडून अभूतिकडे' या तत्वानुसार उपक्रमांची मांडणी करते यातून गणित हसत खेळत व्हावे, विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयातगोडी निर्माण करण्यासाठी माझ्या मुलांचा विकासाचा प्रवास सुरु झाला. पहिलीतील मुले ही निरामय असतात. त्याच्याजवळ कोणातही पूर्वग्रह व संबोधाची गर्दी नसते. त्यामुळे आपण जे गणितीय संबोध त्यांना देऊ ते स्विकारतात.

**उपक्रम १) खेळाच्या माध्यमातून गणनपूर्व तयारी :-**

लहान मुलांना खूप खेळायला आवडते म्हणून मी खेळाच्या माध्यमातून अनुभव दिले जसे.

अध्ययन निष्पत्ती : खेळाच्या माध्यमातून शारीरिक व्यायामात संख्या गणपूर्व क्रिया समजली.

**उपक्रम** : २) अंकाची गाडी (१ ते ९ व ० अंककार्ड)

मुलांना गाणी म्हणायला, नाचायला खूप आवडते. त्याचा वापर अंक तयार करण्यासाठी केला.''अंकाची गोडी''हे कृतीयुक्त गीत वर्गात घेतले तसा हा खेळ वर्गात किंवा मैदानावरही घेता



येतो. वर्गाच्या भिंतीलगत १ ते ९ व ० अंककार्ड तरंगतील या पद्धतीने लावून ठेवते. त्यातून अंकाची ओळख करुन देते. मुलांना वर्गाच्या मध्यभागी गोलाकार उभे करुन मी झांजेच्या तालावर पुढील गाणे म्हणत.




''झुक झुक, झुक झुक अंकाची गाडी,
धुरांच्या रेषा हवेत काढी,
५ हे स्टेशन आले हो,
झटकन उतरुन घ्या हो''

अशा प्रक़ारे कोणताही अंक म्हणून, सांगुन गाणे म्हणत अंक पूर्ण करते. मुले पटकन भिंतीजवळ जाऊन उभे राहतील जो चुकेल तो बाद.

**अध्ययन निष्पत्ती :** १ ते ९ अंकाचे खेळाच्या माध्यमातून दृढीकरण होऊन संख्याज्ञान होते.

**उपक्रम : शब्द भांडार पेटी**

या उपक्रमासाठी भरपूर शब्द पट्टया मी तयार केल्या आहेत. शाळेत असलेली अध्ययन समृद्धी साहित्य संच पेटीतून शब्द पट्ट्या घेऊन एक रिकाम्या डब्यात भरल्या. मुलांना गोलाकार उभे करणे. एकाच्या हातात शब्द पट्ट्यांचा डबा देणे. मी वादन वाजवून बंद होताच ज्याच्या हातात डबा येईल त्याचे त्या डब्यातील कुठलेही दोन शब्द वाचावे अशा प्रकारे हा खेळ पुढे चालू ठेवते.

**अध्ययन निष्पत्ती :**

१) मुलांचे वाचन व शब्द संपत्ती भर पडते.

२) विद्यार्थी-विद्यार्थी आंतरक्रिया वाढीस लागते.

**उपक्रम : स्मरणशक्तीचा खेळ**

शाळेच्या मधल्या सुट्टीत या उपक्रमाची तयारी करते. त्यासाठी परिसरातील वस्तू, अध्ययन साहित्य संच पेटीतील प्राणी, पक्षी इत्यादींची चित्रे, घरातील वस्तू गोळा करुन टेबलावर ठेवते. मुलांचे गट करते. एकेका गटाला बोलावून एक मिनिट टेबलावरील वस्तू पाहण्यास सांगते. प्रत्यक्ष गटाने पाहिलेल्या वस्तू, चित्र यांचे नावे जागेवर जाऊन वहीत, पाटीवर लिहते. जो गट जास्तीत जास्त शब्द लिहितो तो गट जिंकलेल्या गटाला दुसऱ्या दिवशी परिपाठाच्यावेळी चॉकलेट व इतर कोणतेही बक्षिसे देते. शाब्बासकी तर आहेच इतर गटांना प्रोत्साहन द्यायला विसरत नाही. उपक्रमाची थोडक्यात माहिती शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना सांगते हा खेळ आपण शब्द पट्ट्यांसाठी देखील खेळू शकतो.

**अध्ययन निष्पत्ती :-**

१) स्मरणशक्ती वाढीसाठी हसत खेळत अध्यापन होते.

२) विद्यार्थ्यांमध्ये निरीक्षणक्षमता व स्पर्धानूसार चुरस निर्माण होते.




अशा प्रकारे कृतीद्वारे, उपक्रमांद्वारे, खेळांद्वारे ज्ञानदायी शिक्षणातून चिमुकल्यांना गोडी निर्माण करुन उपस्थिती टिकविण्यास मदत होते. माझे वैयक्तिक मत आहे की, खऱ्या शिक्षकांचे काम त्याने आपल्या विद्यार्थ्यां मध्ये शिकण्याची आवड निर्माण केली पाहिजे.

१) पेन्सिल हातात धरतांनाही लटपटणारे हात

जेव्हा हुबेहुब माझ्या अक्षरांची नक्कल करतात ते असते माझे प्रशस्तिपत्र!

२) दिवसातून वीस पंचवीस वेळ शिकवलेली अक्षरे दुसऱ्या दिवशी पुन्हा चुकीच्या उच्चारणारा विद्यार्थी जेव्हा खडाखडा वाचू लागतो. ते असते माझे बक्षिस !

३) आदल्या दिवशी ज्याच्यावर प्रचंड रागावून गेले. तोच विद्यार्थी दुसऱ्या दिवशी सकाळी लांबवर धावत येवून हातातील बॅग स्वत:कडे घेत छानस हसून Good Morning म्हणतांना तोच असतो. माझा पूरस्कार

***श्रीमती. मंगला तुमडू पाटील***
*(राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार सन २०१४)*
*जि.प.शाळा वाडी बु.॥, ता.शिरपूर*


कमल



# माझ्या आव्हानांची यशोगाथा

श्रीमती. संगिता भास्कर मराठे

''विचार बदलला की कृती बदलते, कृती बदलली की स्थिती बदलते अर्थात स्थिती बदलाची असेल तर त्याची सुरुवात विचार बदलापासून होत असते. अगदी तसेच माझ्या विचारांची अचानक बदलली दिशा अन पल्लवीत झाल्या नव्या आशा

पहिल्या दिवसापासूनचा प्रवास...

माझी जिल्हा परिषद शाळा वारगांव, ता.शिंदखेडा,जि.धुळे संपूर्ण आदिवासी, भिल्ल वस्ती असलेली शाळा. शाळेची परिस्थती फारच दयनीय होती. मातीच्या आणि कुडाच्या, भिजत्या आणि पडक्या भिंती, असलेल्या त्या गावात राहणाऱ्या संपूर्ण अशिक्षित वस्तीवरील मोल मजुरी, रोजंदारी, काबाड कष्ट व मेहनतीवर पोट भरणाऱ्या पालकांच्या बालकांची ही शाळा.

पायात चप्पल नाही, अंग झाकायला कपडे नाही की हातात दफ्तर नाही, पोटभर खायला नाही. रोज अंघोळ नाही, डोक्याला तेल नाही, केसांची कटिंग नाही अशी परिस्थिती असलेली बालके मात्र अगात बळ आहे, डोळ्यात स्वप्न आहे, मनात जिद्द आहे. प्रयत्नांची धडपड आहे. बोलण्याची हिम्मत आहे. फक्त या सर्व कौशल्यांना हवी होती एक योग्य दिशा. हिम्मत हे दिशा देण्याचे गुपित मला गावले.

मी वरील सर्व आव्हाने स्विकारुन  विडा उचलला आणि ठरवले की करायचा कायापायट. त्यासाठी मी माझ्या आव्हानांची बकेट लिस्ट तयार केली.




**माझ्या आव्हानांच्या परिपूर्तीसाठी केलेले प्रयत्न-**

प्रथम शाळेतील प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना घरोघरी जाऊन शाळेत आणणे. त्याला कारण म्हणजे सर्व पालक रोज सकाळी मोलमजुरी कामधंदा करण्यासाठी घरातून बाहेर निघून जातात तर मग मुलांना शाळेत पाठवणार कोण ! मुले शाळेत आल्यावर सुरु झाला माझा नित्यक्रम. नळावर साबणाने अंघोळ घालणे, केसांना तेल, कंगवा, पावडर देऊन नीटनेटके तयार करायचे, केस वाढले तर केस कापायचे. माझ्या मुलांना अंगावर घालायला कपडे देखील नव्हते. शाळेचा गणवेश एकच आठ-पंधरा दिवस तोच, अंगातून काढायाचा नाही, धुवायचा नाही, फाटला तरी शिवायचा नाही अशा सवयी. माझ्या परिसरातील, ओळखीतील मित्र-मैत्रिणी, नातेवाईक यांच्याकडे जाऊन त्यांच्या लहान मुलांची वापरलेली पण लहान झालले असे सर्व कपडे मी जमा करायला लागले. अनेकाच्या मदतीने खूप कपडे जमा झाले आणि माझ्या शाळेतील लेकरांचे अंग झाकले गेले. माझी लेकरे ते कपडे घालून खूश झाले.

शाळेचा परिसर आकर्षक दिसण्यासाठी आता मोर्चा वळवला शालेय परिसराकडे. संपूर्ण परिसरात झाडांची, रोपांची,आकर्षक फुलझाडांची मुलांच्या मदतीने लागवड करुन घेतली. परिसर खूप निसर्गरम्य करुन टाकला. शाळा, शाळेच्या भिंती, रंगरंगोटी करू भरपूर नवनविन शैक्षणिक साहित्य तयार करुन वर्गात लावून वर्ग व शाळा सजावट करुन घेतली.

स्वप्न आणि ध्येय माझे खूप मोठे होते आणि समस्या व आव्हानेही मोठी होती.त्यासाठी मला खूप मदतीची गरज होती. पहिली मदत माझ्या ग्रामपंचायतीची घेतली. माझ्या शाळेबाबत भविष्यातील प्रयत्नांविषयी समजावून सांगितले. परिणामी शाळा त्यांच्या मदतीने डिजीटल झाली. शाळेला कंपाऊंड, पाणी योजना, नळ योजना सुद्धा ग्रामपंचायतीने उपलब्ध करुन दिली. असे म्हणतात, प्रयत्नांती परमेश्वर...शाळेत न येणारी व दिवसभर न बसणारी मुले, आता शाळेत येऊ लागली. बसू लागली, हसू लागली, रमु लागली व शिकू देखील लागली.

माझ्या सोबत मुले खूप एकनिष्ठ झाली व आमची जवळीकता ही वाढली. मात्र मला एक अडचण येत होती ती म्हणजे त्यांची भाषा आणि बोलण्याची सवय आदिवासी भिल्ल ही त्यांची भाषा परंतु मिश्र पावरी, अहिराणी, भिलावू या सर्व भाषा एकत्रित बोलायचे. मग ठरवले की, ती मुले कोणत्याही भाषेत बोलली तरी त्यांच्याशी मराठीतच बोलायचे. आणि नाहीच समजले तर त्यांच्या भाषेत समजावून देणे. श्रूतवाचनाचा सराव, मराठी गाणी, कविता व आदर्श परिपाठ असे विविध उपक्रम घेतल्याने मुले अस्सखलित मराठी बोलू लागली. अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर केल्याने शिक्षण मनोरंजनात्मक झाले. यामुळे मुले शाळेत दिवसभर बसू लागली. शाळेला लोकसहभागातून मिळालेल्या डिजीटल साहित्याद्वारे इंग्रजी विषयाचा सराव करुन घेतला. मुलांना हाताळण्याजोगे व आकर्षक वाटतील असे इंग्रजी साहित्य स्वत:च्या कल्पकतेने तयार करुन वर्गात लावले. या साहित्याचा दैनंदिन वापर व सराव घेतल्याने मुले इंग्रजी संभाषण करु लागले. वाचू लागले, लिहू लागले.

पालकांच्या वारंवार भेटी घेऊन त्यांना बालकांचे शिक्षण, आरोग्य व भविष्याविषयी महत्व पटवून दिले. बालकांविषयी जागरुक करण्याचा प्रयत्न केला.अखेर तीन ते चार वर्षाच्या अतोनात प्रयत्नानंतर मी बघितलेल्या स्वप्नांना यश मिळत गेले व खूप मोठा कायापालट झाला

माझी क्रियाशील आणि गुणवंत अशी गोड पाखरे माझ्या शाळेच्या आवारात खेळताना बघून मनाला खूप समाधान मिळते. आज अभिमानाने सांगावेसे वाटते की, मी लावलेल्या रोपट्याचे आज वटवृक्ष झाले. आज माझी जिल्हा परिषद शाळा वारगाव ता.शिंदखेडा हि शाळा सर्व तालुक्यात, बीटात,केंद्रात एक विशेष उल्लेखनीय शाळा म्हणून ओळखली जाऊ लागली. अखेर माझ्या प्रयत्नांची यशाची शिखरे पार केली. अशी ''माझ्या प्रयत्नातील सुंदर शाळा''

***श्रीमती. संगिता भास्कर मराठे***

*उपशिक्षिका*

*जिल्हा परिषद शाळा वारगाव*

*केंद्र बेटावद, ता.शिंदखेडा*

*मोबा: ९५२७३६८४०४*







# गोष्ट स्थलांतरीत बालकांच्या शिक्षणाची

श्रीमती. अरुणा नामदेव पवार

धुळे तालुक्यातील अंचाडेतांडा बंजारा समाजाचे १५०० लोकवस्तीचे छोटेशे गांव ! १००% गावातील लोक ऊस तोडणीसाठी परराज्यात स्थलांतरीत होतात. अशा गावात आमची जिल्हा परिषदेची मराठी शाळा स्थलांतरामुळे मुले शिक्षणापासून वंचित राहण्याचा धोका जास्त. ऊसतोड हाच आपला व्यवसाय आणि त्यातच खूश राहायचे अशी गावकऱ्यांची मानसिकता. पालकांचे अज्ञान, शिक्षणाविषयीची अनास्था, दारिद्र्य यामुळे मुले अभ्यासात मागे होती.

स्थलांतर होत असलेल्या पालकांचे हृदयपरिवर्तन करणे क्रमप्राप्त होते. मग सोबतीला राज्य शैक्षणिक संशोधन परिषद, पुणे महाराष्ट्र येथील समता विभागाचा आधार आणि शासन निर्णय होते.

१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम = २००९

२) सरल प्रणाली शासन निर्णय - ३ जुलै २०१५

३) जलद प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र शासन निर्णय- दि. १जानेवारी २०१७

या शासन निर्णयांनी आम्हाला संवेदनशील केले. आम्ही साऱ्यांनी बालरक्षकाची भूमिका स्विकारली. सर्वप्रथम आम्ही स्थलांतर होत असलेल्या पालकांच्या जवळ जात विश्वास संपादन केला. शाळा व्यवस्थापन समिती सोबत घेऊन गृहभेटी, पालकसभा, प्रेरणासभा घेऊन शिक्षणाचे महत्व पटवून दिले. १००% बालकांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाशिवाय थांबणार नाही यावर आमचा ठाम विश्वास बसला. मुले शाळेत येती, टिकती, शिकती झाली. स्थलांतर थांबविण्यात यश आले. त्याला पुढील बाबी कारणीभूत ठरल्या.

**भौतिक सुविधा उपलब्धी :- (शाळेचे रुप पालटले)**

शाळेचे अंतरंग व बाह्यांग रुप आकर्षक दिसावे. विद्यार्थ्यांला शाळेचे वातावरण आनंदी / प्रसन्न वाटावे म्हणून गावातल्या शिक्षणप्रेमी व्यक्तिच्या सहकार्याने, समितीच्या मदतीने लोकनिधी गोळा करुन पुरेशा प्रमाणात वर्गखोल्या केल्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली. शाळेच्या सर्व भिंती बोलक्या केल्या. वर्ग सजावट केली. विविध चित्र काढून त्यातून स्वच्छतेचे, शिक्षणाचे संदेश दिले. शाळा अगदी नववधूसारखी सुंदर व आकर्षक दिसू लागली.

**शाळेत झाली दर्जेदार शिक्षणाची सुरुवात :-**

विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी शिक्षक आईच्या मायेने वर्ग अध्यापन करु लागले. शिक्षक-विद्यार्थी अंतर कमी झाले. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्विकारले. त्यांचे पोषण, रक्षण व शिक्षण या तिन्हींची जबाबदारी उचलली. ऊस तोडणीसाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना शिक्षण हमी कार्ड देऊन त्याच्या शिक्षणाची सोय केली. जे विद्यार्थी स्थलांतर झाले त्या विद्यार्थ्यांची सोय केली. जे विद्यार्थी स्थलांतर झाले त्या विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण करुन तेथील कारखानदारांना भेटून मुलांच्या शिक्षणाची सोय केली. स्थानिक शिक्षकाची नेमणूक केली. काही विद्यार्थी शाळेत परत आणले.

गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण हेच शाळेचे उद्दिष्टये ठेवले. पहिलीपासूनच इंग्ऱजी विषयावर भर देऊन इंग्रजी विषयाची गोडी निर्माण केली. इतर विषयाचीही संपादणूक पातळी उंचावण्यासाठी प्रयत्न केले. गणित विषयास संख्यावाचन व संख्येवरील क्रिया मुले पटकन करु लागली. विज्ञान युगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांना संगणक/ Tab दिले. वाचनकुटी तयार केली. परिणामी 'शिक्षण हे वाघिणीचे दुध आहे' याचे महत्त्व सगळ्यानाच रुचले. अध्यापनात ई-लर्निंग साधनांचा वापर सुरु झाला.

**शाळेचे नाविन्यपूर्ण उपक्रम :-**

गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षणासाठी शाळेने विविध उपक्रम हाती घेतले. शब्दभांडार वाढीसाठी ''बालकेच माझा शब्दसंग्रह'' हा उपक्रम राबविला. गणिती खेळ, हस्ताक्षर स्पर्धा, कोण बनेगा संख्यापती, शब्दांची दहीहंडी, रेडीओ कार्यक्रम शब्दभेंड्या, श्रृतलेखन कविता गायन, झाडावर चढणे, नदीत पोहणे,

मोबाईलवर विविध प्रश्न सोडविणे, मैदानी खेळ, पाठ्यपुस्तकातील एखादया पाठाचे नाट्यीकरणातून सादरीकरण करणे. इत्यादी उपक्रम घेऊन गुणवत्तेची शाळा, स्थलांतर विरहित शाळा, उपस्थितीने नटलेली शाळा म्हणून पंचक्रोशीत नावारूपाला आली.

विद्यार्थी प्रत्येक उपक्रमांतत आवडीने व आनंदाने सहभाग घेऊ लागले. मुली शिक्षणाच्या प्रवाहात येऊ लागल्या.विविध कलागुणांमध्ये ही बालके पारंगत झाली. बालकांना ज्ञानाचे पंख लावून स्पर्धेत यशाची उंच भरारी घेता आली. झोपडीतील अज्ञानाचा अंधकार दूर झाला. ज्ञानाच्या दिव्याचा उजेड घरोघरी पडू लागला.

गुणवत्तेची बस चहूकडे फिरु लागली.गोरगरीबांची बस, ऊसतोड कामगारांची बस या बसचे एकच ध्येय ''माझा स्थलांतरीत बालक शिक्षणाच्या गावात येऊन पोहाचवणे''

**चल शाळेला चल चल तारा, नको राहू तू घरच्या घरा**

या उक्तीप्रमाणे स्थलांतरित झालेली बालके शाळेत रमू लागली. पुढील तक्ता आमचे यश सांगून जातो.



| **सन २०११ चा पट** | | | | **सन २०२२ चा पट** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| इयत्ता | मुले | मुली | एकूण | इयत्ता | मुले | मुली | एकूण |
| १ ली | ७ | ९ | १६ | १ ली | २० | १४ | ३४ |
| २ री | ७ | ८ | १५ | २ री | १२ | ९ | २१ |
| ३ री | ९ | ४ | १३ | ३ री | १२ | २० | ३२ |
| ४ थी | ९ | ६ | १५ | ४ थी | २५ | २० | ४५ |
| **एकूण** | **३२** | **२७** | **५९** | **एकूण** | **६९** | **६३** | **१३२** |

**समारोप :-** ऊस तोड हेच आपले जीवन मानणाऱ्या बंजारा समाजातील लोकांना आपली मुले गुणवत्तापूर्ण दर्जेदार शिक्षण घेऊन सुजाण/उत्तम नागरिक तयार होतील. स्वत:चे भविष्य उज्वल करतील अशी आशा पल्लवीत झाली.

शेवटी आमचे एकच ब्रीदवाक्य -

''साऱ्या कोवळ्या जीवांना अक्षरांचा स्पर्श व्हावा!
उजेडाचे दान देण्या झोपडीत सुर्य यावा !!
नको असा एकही हात जो पाटीला राखला !
पुस्तकांचा स्पर्श व्हावा त्याचा आईसारखा !!''

***श्रीमती. अरुणा नामदेव पवार***
*मुख्याध्यापक, जिल्हा परिषद शाळा अंचाळेतांडा*
*केंद्र, मुकटी ता.धुळे*





## जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,
## धुळे